# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा

**अर्थसंकल्पीय मा. स्थायी समिती सभा दि. ३/३/२०२० रोजी आयोजित केली होती. सदर सभा तहकूब होऊन ती दि. ६/३/२०२० व दि. ११/३/२०२० रोजी विचार विनिमय करुन शिफारस करणेसाठी पुन्हा बोलविण्यांत आली. सदर सभेचा ठराव.**

**ठराव क्र. ५८१** **दिनांक ११/३/२०२०**

---

**प्रस्तावाचा विषय:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९६ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेसह अ व क अंदाजपत्रकाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९६ मधील तरतुदीप्रमाणे सविस्तर विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने सन २०१९-२० च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०२०-२१ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणेसाठी, पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बेटचे अंदाज व दिव्यांग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकारण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव विचारात घेण्यास शिफारस केली आहे.

**निर्णय :-** पी बजेट, जेण्डर बजेट व दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन २०१९-२० चे सुधारीत अंदाज व सन २०२०-२१ चा मुळ अंदाज तयार करताना मा. स्थायी समितीने दि. ३/०३/२०२० ते दि. ११/०३/२०२० या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

१ प्रस्तावाचे वाचन करतांना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यांत आले.

२ कत्तल खान्याचे उत्पन्न सन २०२०-२१ मध्ये रु. २५ लक्ष तरतुद ऐवजी २.५० लक्ष करण्यांत आली आहे.

३ पे ॲन्ड पार्क वाहनतळ व्यवस्था व नोपार्किग मधील वाहने उचलणे प्रशासकिय शुल्क सन २०२०-२१ मध्ये रु. ७ लक्ष तरतुद ऐवजी १५ लक्ष करण्यांत आली आहे.

४ अतिक्रमण हटविणे, अनधिक्रत बांधकाम तोडणे प्रशासकिय शुल्क सन २०१९-२० मध्ये रु. १५ लक्ष तरतुद ऐवजी रु. ९ कोटी ४९ लक्ष ६० हजार करण्यांत आली आहे.

५ अतिक्रमण हटविणे, अनधिक्रत बांधकाम तोडणे प्रशासकिय शुल्क सन २०२०-२१ मध्ये रु. १५ लक्ष तरतुद ऐवजी रु. ७ कोटी ५० लक्ष करण्यांत आली आहे.

६ बाजार फी/हातगाडी फेरीवाले व इतर सन २०२०-२१ मध्ये रु. ४ कोटी ६० लक्ष तरतुद ऐवजी रु. ६ कोटी २० लक्ष करण्यांत आली आहे.

७ प्रायोगिक तत्वावरील विनातिकीट परिवहन सेवेसह इतर परिवहन सेवा अंशदान सन २०१९-२० मध्ये रु .२२ कोटी ६८ लक्ष तरतुद ऐवजी रु. २३ कोटी २८ लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

८ प्रायागिक तत्वावरील विनातिकीट परिवहन सेवेसह इतर परिवहन सेवा अंशदान सन २०२०-२१ मध्ये रु .६२ कोटी ६८ लक्ष तरतुद ऐवजी रु. ६६ कोटी ५८ लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

९ विकास विषयक कामांसाठी राखीव निधी या लेखाशिर्षात बदल करण्यांत आला व त्यामध्ये निरी/आय.आय.टी या तांत्रिक तज्ञ संस्थे मार्फत पुर प्रतिबंधक कामे होल्डींग पॉन्डस व इतर कामे असे समाविष्ट करण्यांत आले.

१० शहीद जवान निधी सन २०१९-२० मध्ये रु. १ लक्ष तरतुद ऐवजी रु. ५ लक्ष करण्यांत आली आहे.

११ मध्यवर्ती वाचनालय (इमारत बांधकामासह) व्यवस्था सन २०२०-२१ मध्ये रु. ०१ हजार तरतुद ऐवजी रु. ५ कोटी इतकी करण्यांत आली आहे.

१२ मत्सालय निर्मिती सन २०२०-२१ मध्ये रु. ०१ हजार तरतुद ऐवजी रु. १ कोटी ५० लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

१३ सुर्या योजना विद्युत खर्च सन २०१९-२० मध्ये रु. २४ कोटी तरतुद ऐवजी रु. २६ कोटी १० लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

१४ नाले सफाई/ खोदाई सन २०१९-२० मध्ये रु. २५ कोटी तरतुद ऐवजी रु. २० कोटी इतकी करण्यांत आली आहे.

१५ नाले सफाई/ खोदाई सन २०२०-२१ मध्ये रु. १० कोटी २५ लक्ष तरतुद ऐवजी रु. २० कोटी इतकी करण्यांत आली आहे.

१६ अमृत भुयारी गटार योजना सन २०१९-२० मध्ये रु ० तरतुद ऐवजी रु. २ कोटी इतकी करण्यांत आली आहे.

१७ अमृत भुयारी गटार योजना सन २०२०-२१ मध्ये रु ० तरतुद ऐवजी रु. ४ कोटी इतकी करण्यांत आली आहे.

१८ विकास कामांव्यतिरिक्त प्रभाग समिती स्तरावरुन केल्या जाणाऱ्या व्यवहारासाठी विविध लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदी सद्यस्थितीत समप्रमाणात विभागणी करुन नियंत्रण ठेवणेत यावे व आवश्यकतेनुसार मा. आयुक्त सो. यांचे निर्देशाने त्या-त्या लेखा शिर्षातर्गत एकूण उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत प्रभागांतर्गत फेरफार करणे विशेष बाब म्हणून अनुज्ञेय राहील.

१९ विकास कामांसाठी निधीची कमतरता व आस्थापना खर्चाचे अनुज्ञेय मर्यादा विचारात घेऊन तद्नुसार उत्पन्न व खर्च नियंत्रीत करणेच्या दृष्टीने ठोस प्रयत्न करणेस शिफारस करणेत आली.

२० अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच मा. स्थायी समितीने अंतीमत: मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशिल अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असून सदर अर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल.

उपरोग्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या सन २०१९-२० चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२०-२१ चे मुळ पी बजेट, जेण्डर बजेट, दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थ संकप, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना / अमृत योजना / विशेष निधी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(रु. कोटीत)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन २०१९-२० | मुळ अर्थसंकल्प सन २०२०-२१ |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | ५९९.१० | ५६६.९४ |
| जमा रकमा | १३१९.१७ | १४७५.४३ |
| **प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा** | **१९१८.२७** | **२०४२.३७** |
| **खर्च रकमा** | **१३५१.३२** | **१९६१.६३** |
| अखेर शिल्लक | ५६६.९४ | ८०.७४ |

**सुचकाचे नाव :- ------------------------**

**व स्वाक्षरी :-**

**अनुमोदकाचे नाव :- ---------------------------**

**स्वाक्षरी :-**

**अनुकुल संख्या :-** **प्रतिकुल संख्या :-** **तटस्थ संख्या :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**(प्रशांत राऊत)**
**सभापती तथा पिठासीन प्राधिकारी**
**स्थायी समिती**
**वसई विरार शहर महानगरपालिका**